महाराष्ट्राच्या खो-खो खेळाडूंना 'अर्जुन' पुरस्कारासाठी डावलले

लोकसत्ता क्रीडा प्रतिनिधी

पुणे : क्रीडा क्षेत्रातील देशातील सर्वोच्च 'अर्जुन' क्रीडा पुरस्कारांसाठी खो-खो खेळातील महाराष्ट्राच्या पात्र खेळाडूंना वगळून राजस्थानच्या निर्मला भाटी यांची शिफारस केल्याबाबत महाराष्ट्र राज्य खो-खो संघटनेने आक्षेप नोंदवला आहे. पुरस्कारासाठी शिफारशी जाहीर झाल्यानंतर त्वावर ऑनलाइन पद्धतीने हरकत नोंदवली असून, पंतप्रधानांच्या तक्रार निवारण संकेतस्थळावरही तक्रार नोंदवल्याचे संघटनेचे सचिव चंद्रजित जाधव यांनी सांगितले.

देशाची मान उंचावणाऱ्या आणि सर्वोत्तम कामगिरी करणाऱ्या खेळाडूंना 'अर्जुन' क्रीडा पुरस्काराने गौरविण्यात येते. महाराष्ट्राचे सुयश गरगटे, अनिकेत पोटे आणि प्रियांका इंगळे यांनी या वर्षी झालेल्या विश्वचषक स्पर्धेत भारताच्या विजयात मोलाची कामगिरी बजावली होती. प्रियांका तर या स्पर्धेत महाराष्ट्राची कर्णधार होती. तसेच, अंतिम सामन्यातील सर्वोत्कृष्ट खेळाडू ठरली होती. सुयश आणि अनिकेत यांचादेखील महाराष्ट्राच्या विजयात महत्त्वाचा वाटा असताना अशा पात्र खेळाडूंना सरळ डावलले गेले असल्याचे राज्य खो-खो संघटनेचे म्हणणे असून, निर्मला भाटीकडून सादर करण्यात आलेले प्रमाणपत्र आणि आवश्यक कागदपत्रांची तपासणी करण्यात यावी, अशी मागणीही संघटनेने केली आहे.

'अर्जुन' क्रीडा पुरस्कारांसाठी खो-खो खेळातील महाराष्ट्राच्या पात्र खेळाडूंना वगळण्यात आल्याने महाराष्ट्र राज्य खो-खो संघटनेने आक्षेप नोंदवला आहे.

''कुठल्याही खेळाडूवर आम्हाला अन्याय करायचा नाही. पण, त्याची पात्रता लक्षात घेण्यात यावी आणि भाटीने सादर केलेल्या आवश्यक कागदपत्रांची चौकशी करावी,'' अशी मागणी जाधव यांनी केली आहे. कधीही पूर्ण सामना खेळू न शकलेली भाटी हिने आतापर्यंत कोणत्याही राष्ट्रीय पातळीवरील सुवर्णपदकही मिळविलेले नाही. त्यामुळे या शिफारसीमध्ये तुलनात्मक मूल्यमापन आणि गुणवत्ताधिष्ठित निवड प्रक्रियेबाबत आम्हाला शंका असल्याची टीकाही जाधव यांनी केली.

''भाटीने भारत-नेपाळ यांच्या दरम्यान झालेल्या कसोटी सामन्यातील प्रमाणपत्रे आंतरराष्ट्रीय सहभाग म्हणून सादर केली आहेत. या सामन्याला केंद्र सरकार किंवा क्रीडा प्राधिकरणाचीही मान्यता नव्हती. संघ निवडीसाठी कुठलीही अधिकृत निवड चाचणी घेण्यात आली नव्हती. केवळ उत्तर प्रदेश, राजस्थान, बिहार अशा राज्यांतीलच खेळाडूंचा सहभाग होता. मान्यता नसलेली स्पर्धा महत्त्वाची, की विश्वचषक स्पर्धा,'' असा प्रश्न जाधव यांनी उपस्थित केला.

''महाराष्ट्र ऑलिम्पिक संघटनेचे अध्यक्ष आणि राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनादेखील याविषयी कल्पना दिली आहे. पवार यांनी तातडीने क्रीडा राज्यमंत्री रक्षा खडसे यांच्याशी संपर्क साधून त्यांचे या तक्रारीकडे लक्ष वेधले आहे. खडसे यांनी तातडीने आपल्या अधिकाऱ्यांना या प्रकरणी चौकशी करण्यास सांगितले आहे,'' अशी माहिती जाधव यांनी दिली.

खो-खोला पुरस्कार दिला नाही, तरी एक वेळ चालेल. पण, तो चुकीच्या व्यक्तीला जायला नको. 'खेलरत्न' पुरस्कारानंतर हा देशातील दुसरा सर्वोच्च पुरस्कार आहे. त्याचा दर्जा राखायलाच हवा.
– चंद्रजित जाधव, सचिव, महाराष्ट्र राज्य खो-खो संघटना.

चौथ्या ॲशेस कसोटीत ऑस्ट्रेलियावर दोन दिवसांत मात

इंग्लंडचा विजयाचा दुष्काळ संपुष्टात

एपी, मेलबर्न

इंग्लंड क्रिकेट संघाने ऑस्ट्रेलियाविरुद्धचा १८ सामन्यांचा आणि पाच हजार ४६८ दिवसांपासूनचा विजयाचा दुष्काळ ॲशेस मालिकेतील चौथ्या कसोटी सामन्यात दोन दिवसांत संपुष्टात आणला. इंग्लंडने दुसऱ्या दिवशी चार गडी राखून विजय मिळविला.

सध्या सुरू असलेल्या मालिकेत ऑस्ट्रेलियाने पर्थ, ब्रिस्बेन आणि ॲडलेड येथील मैदानांवर केवळ अकरा दिवसांत तीन कसोटी सामने जिंकून ॲशेस आपल्याकडेच राखल्या होत्या. चौथ्या कसोटी सामन्यात गोलंदाजांना पूरक अशा परिस्थितीचा फायदा इंग्लंडच्या गोलंदाजांनी दोन्ही डावांत अधिक चांगला उठवला आणि दोन दिवसांत विजय मिळवून मालिका गमावल्याचे आपले दुःख कमी केले.

मालिकेतील दुसरा सामना दोन दिवसांत संपुष्टात आला. क्रिकेटच्या इतिहासात १२९ वर्षांत प्रथमच एका मालिकेत दोन सामने दोन दिवसांत संपण्याची ही पहिलीच वेळ ठरली. दरम्यान, दुसऱ्या दिवशी देखील एमसीजी मैदानावर ९२,०४५ प्रेक्षकांनी उपस्थिती लावली.

खेळपट्टीवरील गवत आणि वेगवान गोलंदाजीसाठी पूरक हवामानाचा फायदा इंग्लंडच्या गोलंदाजांनी अधिक चांगला उचलला. सामन्यातील तिसऱ्या डावात ऑस्ट्रेलियाच्या फलंदाजांनी आत्मघातकी फलंदाजी करून जणू पराभवाला आमंत्रण दिले. ब्रायडन कार्स (४/३४), बेन स्टोक्स (३/२४) आणि जोश टंग (२/४४) यांनी ऑस्ट्रेलियाचा दुसरा डाव १३२ धावांत गुंडाळून विजयाचे लक्ष्य १७५ पर्यंत मर्यादित ठेवण्यात यश मिळविले.

विजयासाठी प्रयत्न करताना इंग्लंडने आपली 'बॅझबॉल' रणनीती पुन्हा दाखवली. झॅक क्रॉली (३७) आणि बेन डकेट (३४) यांनी ५१ धावांची सलामी दिली. त्यानंतर त्रावीक अंतराने सलामीच्या जोडीसह बढती मिळालेला ब्रायडन कार्स असे तीन फलंदाज गमावले. मात्र, युवा बेथेलने एकबाजून लावून धरताना इंग्लंडचा मार्ग सुकर केला. मात्र, तो विजयापर्यंत टिकला नाही. विजय समोर दिसत असताना इंग्लंडने बेथेल (४०), जो रूट (१५) आणि बेन स्टोक्स (२) यांना गमावले. मात्र, आक्रमक फलंदाजीसाठी ओळखल्या जाणाऱ्या हॅरी ब्रूक (नाबाद १८) आणि जेमी स्मिथने (नाबाद ३) यांनी विजयाची संधी साेडली नाही. इंग्लंडने ३२.२ षटकांत ६ बाद १७८ धावा करून विजय मिळविला. पहिल्या डावात हाच इंग्लंड संघ तीस षटकेही खेळू शकला नव्हता.

१८ सामने आणि ५,४६८ दिवसांची प्रतीक्षा

इंग्लंडच्या ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या पराभवाचा मालिका २०१३-१४ मध्ये सुरू झाली. तेव्हा ऑस्ट्रेलियाने ५-० असा विजय मिळविला. त्याच वेळी इंग्लंडने ऑस्ट्रेलियाविरुद्ध २०१७-१९ मध्ये ॲशेस मालिका ३-१ ने जिंकली होती. जवळपास ११५ वर्षे म्हणजे ५,४६८ दिवसांच्या कालावधीत इंग्लंड ऑस्ट्रेलियाविरुद्ध १८ सामने खेळले. त्यापैकी १६ सामने त्यांनी गमावले, तर २ अनिर्णित राहिले होते. इतक्या प्रदीर्घ प्रतीक्षेनंतर इंग्लंडने ऑस्ट्रेलियाविरुद्धचा दुष्काळ असा दोन दिवसांत संपुष्टात आणला. दुसऱ्यांदा कसोटी सामना दोन दिवसांत संपुष्टात आल्यानंतर खेळपट्टीवर टीका होणे साहजिकच होते. विशेष म्हणजे क्रिकेट ऑस्ट्रेलियाचे मुख्य कार्यकारी अधिकारी टॉड ग्रीनबर्ग यांनी कसोटी दोन दिवसांत संपणे क्रिकेटसाठी आणि व्यवसायासाठी वाईट आहे. आम्ही खेळपट्टीच्या तयारीत हस्तक्षेप न करण्याचे धोरण ठेवले होते. आता भविष्यात खेळपट्टीच्या तयारीत आम्ही सक्रिय राहू असे ग्रीनबर्ग म्हणाले.

संक्षिप्त धावफलक

- **ऑस्ट्रेलिया** (पहिला डाव) : १५२
- **इंग्लंड** (पहिला डाव) : ११०
- **ऑस्ट्रेलिया** (दुसरा डाव) : ३४.३ षटकांत सर्वबाद १३२ (ट्रॅव्हिस हेड ४६, स्टीव्ह स्मिथ नाबाद २४; ब्रायडन कार्स ४/३४, बेन स्टोक्स ३/२४, जोश टंग २/४४)
- **इंग्लंड** (दुसरा डाव) : ३२.२ षटकांत ६ बाद १७८ (जेकब बेथेल ४०, झॅक क्रॉली ३७, बेन डकेट ३४; झाय रिचर्डसन २/२२, स्कॉट बोलंड २/२९, मिचेल स्टार्क २/५५)

...तर, टीकेची झोड उठली असती - स्टोक्स

मेलबर्न : ॲशेस मालिकेत दुसऱ्यांदा कसोटी सामना दोन दिवसांत निकाली ठरलेल्या सामन्यात विजयी संघाचा कर्णधार बेन स्टोक्सनेच जगातील इतरत्र केंद्रावर सामना असा दोन दिवसांत संपला असता, तर अशा खेळपट्टीवर टीकेची झोड उठवली असती, अशी प्रतिक्रिया देत आंतरराष्ट्रीय क्रिकेट व्यवस्थापनाच्या मर्मावर बोट ठेवले. माजी क्रिकेटपटू इंग्लंडचा केविन पीटरसन आणि भारताचा दिनेश कार्तिक यांनी या संदर्भात स्टोक्सला साथ दिली. फिरकी गोलंदाजांना मोठ्या प्रमाणात बळी मिळतात, तेव्हा भारतातील खेळपट्ट्यांवर टीका केली जाते, असे कार्तिक म्हणाला. "ॲशेस काय किंवा कुठलाही कसोटी सामना दोन दिवसांत निकाली ठरणे योग्य नाही. एकदा सामना सुरू झाल्यावर तुम्ही काही करू शकत नाही. तुम्हाला समोर येईल त्या परिस्थितीचा सामना करून खेळावे लागते. अशा खेळपट्टीवर आम्ही धाडसाने खेळलो आणि बाजी मारून दाखवली," असे स्टोक्स म्हणाला.

लय राखण्याचे भारतीय महिला संघाचे लक्ष्य

थिरुवनंतपुरम : पहिल्या तीन सामन्यांत विजय मिळवत मालिका याआधीच आपल्या नावे केलेला भारतीय महिला संघ आज, रविवारी श्रीलंकेविरुद्ध होणाऱ्या चौथ्या ट्वेन्टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यात लय कायम राखण्याचा प्रयत्न करेल. हरमनप्रीत कौरच्या नेतृत्वाखालील संघाने पाच सामन्यांच्या मालिकेत आतापर्यंत आपले वर्चस्व राखले आहे. श्रीलंकेला भारतासमोर कुठलेच आव्हान उपस्थित करता आलेले नाही.

भारतीय संघ मालिकेत ३-० अशा आघाडीवर आहे. यजमानांनी तीनही सामन्यांत आकानाचा पाठलाग करीत विजय साकारला. कुठल्याही सामन्यात भारताने १४.४ षटकांच्या पुढे फलंदाजी केली नाही. त्यांनी तीनहून अधिक फलंदाजही गमावले नाहीत. तसेच, १२९हून अधिकचे लक्ष्यही त्यांना मिळाले नाही. भारताच्या या यशाचे श्रेय भारतीय गोलंदाजांना जाते. भारतीय फलंदाजांची गोलंदाजांना चांगली साथ मिळाली आहे.

- **वेळ :** सायं ७ वा.
- **थेट प्रक्षेपण :** स्टार स्पोर्ट्स १, जिओहॉटस्टार ॲप.

कसोटी प्रशिक्षकाच्या पर्यायाबाबत 'बीसीसीआय' 'गंभीर'?

जयपूर : भारतीय क्रिकेट संघाचे मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीर यांचे प्रशिक्षक म्हणून असलेले योगदान मर्यादित षटकांच्या क्रिकेटमध्ये उठून दिसत असले, तरी कसोटी क्रिकेटमध्ये दक्षिण आफ्रिकेविरुद्ध दोन्ही सामन्यातील पराभवानंतर भारतीय क्रिकेट नियामक मंडळ (बीसीसीआय) प्रशिक्षकाच्या पर्यायाचा गंभीरपणे विचार करू लागले आहे.

'बीसीसीआय'कडून मिळालेल्या माहितीनुसार एका पदाधिकाऱ्याने व्ही.व्ही.एस.लक्ष्मण यांच्याशी संपर्क देखील साधला असल्याचे समजते. मात्र, आपण सर्वोच्च केंद्रातील (सेंटर ऑफ एक्सलन्स) भूमिकेत समाधानी असल्याचे लक्ष्मणने म्हटले असल्याचे या पदाधिकाऱ्याने सांगितले.

गंभीर यांच्याबरोबरचा करार २०२७ एकदिवसीय विश्वचषकपर्यंतचा आहे. मात्र, आता 'बीसीसीआय'कडून ट्वेन्टी-२० विश्वचषक स्पर्धेतील भारताच्या कामगिरीनुसार त्यांच्या कराराचा फेरविचार केला जाण्याची शक्यता नाकारता येत नाही.

चोलामंडलम इन्व्हेस्टमेंट ॲण्ड फायनान्स कंपनी लिमिटेड

कॉर्पोरेट कार्यालय: "चोला क्रेस्ट", तिसरा मजला, सी५४ व सी५५, सुपर "बी"-४, थिरू वि का इंडस्ट्रियल इस्टेट, गुईंडी, चेन्नई- ६०००३२. नाशिक शाखा कार्यालय पत्ता: तिसरा मजला, सह्याद्री बिझनेस पार्क, एकबोटे फर्निचर शोरूमच्या वरती, मायको सर्कलजवळ, नाशिक- ४२२००२.

सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स ॲण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२च्या सेक्शन १३(२) अंतर्गत मागणी सूचना

तुम्हास, याखाली नमूद केलेले ऋणको/ गहाणकारांना याद्वारा कळविण्यात येते की, कंपनीने सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स ॲण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ अंतर्गत तुमच्या विरोधात प्रक्रिया सुरू केली आहे आणि ऋणकोंकरिता रजिस्टर्ड पोस्ट ॲक्नो. द्वारा तुम्हास पाठविलेली ॲक्टच्या सेक्शन १३(२) अंतर्गत सूचना पोहोचवणी न होताच परत आली आहे, म्हणून, तुम्हास सूचना स्वीकारण्यास आणि या सूचनेच्या प्रसिद्धीच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत त्यामधून निपाटलेल्या ऋणासह देय रकमेच्या अनुसार नमूद केलेल्या थकीत कर्जा रकमेचे प्रदान करण्यास फर्मावियात आले आहे, त्यास असमर्थ ठरल्यास कंपनी ऋण व किमतीसह तिच्या देयीच्या वसुलीकरिता खाली नमूद केलेल्या सुरक्षेची अंमलबजावणी करून ॲक्टच्या सेक्शन १३ च्या सब-सेक्शन (४) अंतर्गत तिच्या हक्काची अंमलबजावणी करून तुमच्या विरोधात प्रक्रिया सुरू करील. असे नमूद करण्याची आवश्यकता नाही की, ही सूचना कंपनीला उपलब्ध असलेल्या अन्य उपायांबाधित कोणताही पूर्वग्रह न ठेवता तुम्हाला उद्देशून आहे.

अनु. क्र.	लोन अका. नं./ ऋणकोचे नाव व पत्ता	कर्ज रक्कम	मागणी सूचनेची तारीख व थकीत रक्कम
१.	लोन अका. नं.: X0HENSP00002231192 १. अशोक भागवत हागोटे (अर्जदार), २. मेसर्स अशोक भागवत हागोटे (सह-अर्जदार), ३. मंगल अशोक हागोटे (सह-अर्जदार), सर्वांचा पत्ता- एच नं. ७४४, मुसळगाव फाटा, सिन्नर, नाशिक, निलकमल कं. लि.च्यासमोर, सिन्नर, नाशिक- ४२२१०३.	रु. ६,५०,०००/-	०९.१२.२०२५ व रु. २०२०४३/- ०९.१२.२०२५ रोजीप्रमाणे

मालमत्तेची अनुसूची : पुढील मालमत्तेचे सर्व खंड व तुकडे- मालमत्ता धारण केलेला डुप्लेक्स ही हाऊस नं. ५२ (तळमजला + पहिला मजला) बिल्ट-अप एरिआ सुमारे मोजमापाचा ६३०.०० चौ.फू. म्हणजेच ५८.९२ चौ. मी., जमीन धारण केलेला प्लॉट नं. ५८ यावर बांधकाम केलेले, एरिआ सुमारे मोजमापाचा ४०.७७ चौ.मी., प्लॉट नं. ४६ ते ६१ यापैकी, सर्वे नं. ९२२/४/१/२-४/२ मधील, एकूण मोजमापाचा सुमारे एरिआ ३८१४.२६ चौ.मी., "जानदा पार्क सहा. गृहनिर्माण सोसायटी" मधील, येथे स्थित- सिन्नर, ता. सिन्नर, जि. नाशिक आणि पुढीलप्रमाणे सीमित- पूर्व- ते हाऊस नं. ६१, पश्चिम- १२ मी. रूंद कॉलनी रोड, उत्तर- सर्वे नं. ९२२ चे उर्वरित जमीन, दक्षिण- २ मी. रूंद कॉलनी रोड.

दिनांक: २८.१२.२०२५ स्वाक्षरी/- प्राधिकृत अधिकारी
स्थळ: नाशिक चोलामंडलम इन्व्हेस्टमेंट ॲण्ड फायनान्स कंपनी लिमिटेड

ॲसेट्स केअर ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन एन्टरप्राइज लि.

नोंदणीकृत कार्यालय : १४था मजला, इर्रोस कॉर्पोरेट टॉवर, नेहरू प्लेस, नवी दिल्ली-११००१९. टेलि. : ९१-११-४३११५६०० फॅक्स : ९१-११-४३११५६१८
कॉर्पोरेट कार्यालय : युनिट नं. ५०२, सी विंग, वन बीकेसी, रॉडियस डेव्हलपर्स, प्लॉट नं. सी ६६, जी ब्लॉक, बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, मुंबई- ४०० ०५१.
ई-मेल : acre.arc@acreindia.com वेबसाइट : www.acreindia.in CIN : U65993DL2002PLC115769

परिशिष्ट IV-ए - स्थावर मालमत्तेच्या विक्रीकरिता विक्री सूचना

सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२च्या रुल ८(६) व रुल ९(१)च्या तरतुदीस्ह वाचलेल्या सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स ॲण्ड एन्फोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ अंतर्गत स्थावर मत्तेच्या विक्रीकरिता ई-लिलाव विक्री सूचना.

याद्वारा आम ज्नतेस आणि विशेषकरून ऋणको, सह-ऋणको, गहाणकार व हमीदारांना सूचना देण्यात आली आहे की, यायर पणिलेली स्थावर मालमत्ता ॲसेट्स केअर ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन एन्टरप्राइज लि.कडे [CIN : U65993PLC115769] ("सुरक्षित धनको") गहाण आहे/ तारण आहे, जिचा प्रत्यक्ष तसा सुरक्षित धनकोच्या प्राधिकृत अधिकारीद्वारा घेण्यात आला आहे. सदर स्थावर मालमत्तेची विक्री फ्रीझ मालमत्तेकरिता याद्वारी नमूद केलेल्या राखीव किंमत व इसारा रक्कम ठेवीच्या खालील ठिकाणी, सह-ऋणको, गहाणकार व हमीदारांकडील सुरक्षित धनकोस देय असलेल्या रकमेच्या वसुलीकरिता "जसे आहे जेथे आहे", "जसे आहे जे काही आहे" आणि "जे काही आहे तेथे आहे" या आधारे करण्यात येणार आहे.

सुरक्षित मत्तेचा तपशील

अ. क्र.	लोन अका. नं. व एसीआरई ट्रस्टचे नाव	ऋणको, सह-ऋणको, गहाणकार व हमीदाराचे नाव	एकूण थकीत देणी १४-डिसें.-२५ रोजीप्रमाणे (रु.त)	राखीव किंमत (रु.त)	इसारा रक्कम ठेव (रु.त)	इरठे प्रदानाकरिता बँक खाते तपशील
१	16256032 ACRE 158 TRUST	उजागीर बेबू यादव (ऋणको) अमरावती उजागीर यादव (सह-ऋणको)	रु. २३२०६६९/- रुपये तेवीस लाख चौस हजार सहाशे एकोणसतर फक्त	रु. १२,००,०००/- रुपये बारा लाख फक्त)	रु. १,२०,०००/- रुपये एक लाख वीस हजार फक्त	खात्याचे नाव : ACRE 158 TRUST खाते क्रमांक : 0901102000041876, बँक : आयडीबीआय बँक आयएफएससी कोड : IBKL0000901

सुरक्षित मत्तेचा वर्णन : "फ्लॅट नं. ०४ (चार), 'गौरी रेसिडेन्सी' म्हणून ज्ञात असलेल्या बिल्डिंगच्या दुसऱ्या मजल्यावरील, यावरील खंड १ मध्ये पणिलेल्या फ्लॅट मालमत्तेवर बांधकाम केलेले, नाशिक म्युनिसिपल कॉर्पोरेशन, नाशिकद्वारा मंजूर केलेल्या बिल्डिंग प्लॅननुसार, ४८.७२ चौ.मी. कार्पेट एरियासह आणि त्याच्या सीमा पुढीलप्रमाणे आहेत : पूर्व : कॉमन पॅसेज व फ्लॅट नं. ३०, पश्चिम : स्टेअरकेस व फ्लॅट नं. ३, दक्षिण : सर्वे नं. ११०कडील लगतची मालमत्ता, उत्तर : फ्लॅट नं. २४."

वर नमूद केलेली स्थावर मालमत्ता समाविष्ट, सर्व हक्क, नामाधिकार, हित, अंतर्निहित सुरक्षा, वचनबद्धता आणि/ किंवा इमी यासह पणिल कर्ज खाते वर तरतूद केल्यानुसार रकान्यात स्पष्टपणे नमूद केलेल्या विविध न्यायांचे विक्षत म्हणून कार्यरत असलेली ॲसेट्स केअर ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन एन्टरप्राइज लि.कडे अधिकारांकित केले आहे.

	लिलाव प्रक्रियेसंबंधित महत्त्वाची माहिती	
१	इरठे डिमाण्ड ड्राफ्ट/ आरटीजीएस/ एनईएफटीद्वारा वर नमूद केलेल्या बँक खात्याच्या नावे काढावयाची आहे/ प्रदान करायाची आहे.	
२	लिलावाची तारीख व वेळ	२८-जानेवारी-२०२६ रोजी दु. ०२.३० ते दु. ०३.३०
३	इरठेच्या सादरीकरणाची शेवटची तारीख	२७ जानेवारी २०२६, दु. ०४.०० वा.पर्यंत
४	लिलावाकरिता वेबसाइट	www.bankeauctions.com
५	संपर्क तपशील	रोहन सावंत - ९८३३१४३०१४ / जितेश सावंत - ९०८२५२२४५५
६	मालमत्तेची पाहणी केवळ भेटीची पूर्वनोंद ठरवून.	
७	विक्रीच्या सविस्तर शर्ती व अटींकरिता, कृपया वेबसाइटला भेट द्यावी - www.acreindia.in / www.bankeauctions.com	

दिनांक : २८.१२.२०२५ / स्थळ : नाशिक स्वाक्षरी/- प्राधिकृत अधिकारी, ॲसेट्स केअर ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन एन्टरप्राइज लि.

हे पत्र वेरी टवर यांनी मालक र इंडियन एक्सप्रेस (पे) लिमिटेड (आधीचे नाव - र इंडियन एक्सप्रेस लिमिटेड) यांच्यासाठी इंडियन एक्सप्रेस प्रेस, प्लॉट नं. १२०-२८, टेलिनी इंडस्ट्रियल एरिया, माहुरे, नवी मुंबई-४०० ७१० येथे छापून मकतावत सेंटर, साठा मजला, रामभाव पोरेश्वा मार्ग, नरिमन पॉइंट, मुंबई-४०० ०२१ येथे प्रसिद्ध केले. **लोकसत्ता कार्यालय :** मकतावत सेंटर, साठा मजला, रामभाव पोरेश्वा मार्ग, नरिमन पॉइंट, मुंबई-४०० ०२१. दूरध्वनी : २२०२२६२७/६७४१०००० फॅक्स : २२८२२१८७.
महाराष्ट्र कार्यालय : प्लॉट नं. ई.१३१ ३३८, टेलिनी इंडस्ट्रियल एरिया, माहुरे, नवी मुंबई-४०० ७१०. दूरध्वनी : ०२२-२७६३१९००; फॅक्स : ०२२-२७६३१९०८. **पुणे कार्यालय :** एक्सप्रेस हाऊस, प्लॉट नं. १२०५ /२/६, डिनिझ रस्ता, शिवाजीनगर, पुणे - ४११ ००४. दूरध्वनी : ०२०-६७२१०००. **नागपूर कार्यालय :** प्लॉट. न. ३८, ॲडिशन टेड सेंटर, पहिला मजला, झाशी ले-आऊट (अंबाझी) नागपूर-४४००१८. दूरध्वनी : ०७१२-२२३०४२१, २२३६८१७.
■ अध्यक्ष, संचालक मंडळ : विवेक गोएंका ■ कार्यकारी प्रकाशक : वेदांती ठक्कर ■ संपादक : गिरीश कुबेर ■ वित्तासी संचालक : सिद्धार्थ खांडेकर* ("पी.आर.पी. कायद्यानुसार संपादकीय नवबदलाची यांचाकडे आहे.) R. N. I. Reg. No. MAHMAR/2006/19943 © र इंडियन एक्सप्रेस (पे) लिमिटेड. सर्व हक्क सुरक्षित. लेखी अनुमतिशिवाय संपूर्ण अथवा अंशतः पुनःप्रकाशनास या पुनःप्रकाशनास मनाई. ■ कोलकाता, दिल्लीसाठी प्रत्येकी १० रुपये.